**प्रसिध्दी पत्रक** दिनांक : २९/११/२०२४

**महावितरण उपकेंद्र सिडकोचे सहायक लेखापाल सोनाजी श्रीमंगले व विद्युत सहायक गजानन केंद्रे यांनी तक्रारदार यांचे सोलार कनेक्शन घेतल्यानंतर काढुन नेलेल्या जुन्या मिटरवरील वाढीव बिल निल करण्याकरीता २५,०००/— रू ची मागणी करून २०,०००/—रूपयांची लाच स्विकारली म्हणुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| पोलीस ठाणे | नांदेड ग्रामिण |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गुरनं ११०९/२०२४ कलम ७, १२ भ्र.प्र.अ.१९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दि.२९.११.२०२४ चे ०१.१७ वाजता स्टे.डा नोंद नं ०४ वर |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुददा व पत्ता | १) सोनाजी मोतीराम श्रीमंगले, पद सहा. लेखापाल, २) गजानन कोंडीबा केंद्रे,पद विद्युत सहायक, दोघे नेम. ३३ के.व्ही. उपकेंद्र, एमआयडीसी शाखा, सिडको, नांदेड. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. २५,०००/— |
| लाच स्विकारली रक्कम | रु. २०,०००/— |

थोडक्यात माहिती

यातील तक्रारदार यांनी दि.२६/११/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे हजर येवून तक्रार दिली की, त्यांचे अपार्टमेंटमध्ये एकुण तीन मिटर असून त्यापैकी त्यांनी दोन मिटरवर सोलार कनेक्शन घेतल्यामुळे एमएसईबी कर्मचारी यांनी दि.०२/०९/२०२४ रोजी दोन जुने मिटर काढून घेवून गेले. त्यानंतर दि.०६/१०/२०२४ रोजी तक्रारदार यांच्याकडे एमएसईबीचे विदयुत सहाय्यक केंद्रे हे आले व त्यांनी सांगितले की, तुमच्या मिटरवर वाढीव रिडींग असून तुम्हाला जवळपास दोन लाख रूपये लाईट बिल येईल. त्यासाठी तुम्ही आमच्या अधिकाऱ्यांना कार्यालयात येवून बोलून घ्या असे सांगितले. त्यांचे सांगण्याप्रमाणे तक्रारदार हे एमआयडीसी शाखा सिडको, नांदेड येथे जावून लेखा विभागातील लेखापाल श्रीमंगले यांना भेटले. त्यांनी त्यांचे कम्प्युटरवर लाईट बिल संदर्भात रिडींग दाखवून तुम्हाला २ लाख रूपये बिल येईल अशी भिती घालून तक्रारदार यांच्याकडून ५,०००/— रूपये घेतले व तुमचे बिल निल करायचे असेल तर, आणखीन २०,०००/— रूपये द्यावे लागतील असे म्हणाले.

त्यानंतर दि.२६/१०/२०२४ रोजी तक्रारदार यांच्याकडे सोलार कनेक्शन बसविणारे ओमकार पवार हे आले व त्यांनी सांगितले की, तुमच्या मिटरचे बिल संदर्भात तुम्हाला एमएसईबी ऑफीस, सिडको येथे श्रीमंगले यांनी बोलाविले आहे असे मला विदयुत सहाय्यक केंद्रे यांनी तुम्हाला निरोप दयायला सांगितले आहे. असे सांगितले. श्रीमंगले मागत असलेले २०,०००/— रूपये रक्कम ही लाच असल्याची तक्रारदार यांना खात्री झाली. त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी याबाबत ला.प्र.वि. नांदेड कडे तक्रार दिली.

नमुद तक्रारीवरून ला.प्र.वि, नांदेडकडून दि.२८/११/२०२४ रोजी लाच मागणी पडताळणी कार्यवाही करण्यात आली. कार्यवाहीत आलोसे सोनाजी श्रीमंगले यांनी पंचासमक्ष आधी पाच हजार दिले, आता राहिलेले वीस हजार रूपये द्या अशी लाचेची मागणी करून लाच स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमेसह पाठविले. तेव्हा लोकसेवक श्रीमंगले यांनी विदयुत सहाय्यक केंद्रे यांच्याकडे द्या असे सांगितले. तक्रारदार हे विदयुत सहाय्यक केंद्रे यांच्याकडे लाचेची रक्कम घेवून गेले. त्यावेळी विदयुत सहाय्यक केंद्रे यांनी पवार कडे द्या असे म्हणून लाच स्विकारण्यास प्रोत्साहन दिले. तेव्हा तक्रारदार यांनी श्रीमंगले यांनी तुमच्याकडे देण्यास सांगितले आहे असे म्हणाल्याने लोकसेवक केंद्रे यांनी लोकसेवक श्रीमंगले यांना फोन लावून तक्रारदार यांच्याकडे मोबाईल दिले. तेव्हा तक्रारदार यांनी मोबाईलवर श्रीमंगले यांना कुठे आहेत असे विचारले असता, त्यांनी मी पाठीमागे आहे या असे म्हणून तक्रारदार यांना बोलावून घेतले. त्यानंतर लोकसेवक श्रीमंगले यांनी तक्रारदार यांच्याकडून लाचेची रक्कम २०,०००/— रूपये पंचासमक्ष स्विकारतांना रंगेहाथ मिळून आले आहे.

यातील दोन्ही आरोपी लोकसेवक यांना ताब्यात घेण्यात आले असून पो.स्टे. नांदेड ग्रामीण, ता. जि.नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| मार्गदर्शक | श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, डॉ. संजय तुंगार अपर पोलीस अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्रीमती प्रिती जाधव, पोलीस निरीक्षक, लाप्रवि नांदेड, हे करीत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डींग स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
| संपर्क कमांक :— 02462—253512<br>टोल फ्री कमांक— 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9545531234 | पोलीस उपअधीक्षक 9870145915 |
| ई—मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई—मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |

कार्यालय, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, नांदेड युनिट

पोलीस उपअधीक्षक
लाचलचपत प्रतिबंधक विभाग नांदेड

Scanned with CamScanner